# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

## ४१२-ई, शिवाजीनगर, पुणे- ४११ ०१६.

फॅक्स २५६५६२३४ Email : ropune@dtemaharashtra.gov.in Web Site : - www.ropune.org.in

**अत्यंत महत्वाचे / कालमर्यादित :**

जा.क्र.तंशिविकापु/विवि/माहिती/२०१९/ 2729

**परिपत्रक :**

दिनांक : 01 JUL 2019

प्रति,
संचालक / प्राचार्य,
या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त असलेल्या,
व्यावसायिक अभ्यासक्रम राबविणा-या सर्व पदव्युत्तर संस्था(पुणे विभाग).

**विषय :- शैक्षणिक वर्ष २०१९-२० साठी तांत्रिक व्यावयासिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी संस्थांची माहिती पडताळणी करुन अद्ययावत करणेबाबत...**

संदर्भ :- १.मा. संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, म. रा. मुंबई यांचे पत्र क्रमांक : २अ/एडीएम/२०१९/५०६, दिनांक २८/०६/२०१९

उपरोक्त विषयाचे संदर्भिय पत्र या कार्यालयास प्राप्त झाले असून, सुलभ संदर्भासाठी सदर पत्रांची छायांकित प्रत या सोबत जोडली आहे. सदर पत्राच्या अनुषंगाने, या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त असलेल्या सर्व व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या पदव्युत्तर पदवी संस्थांना या परिपत्रकाव्दारे कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०१९-२० वर्षासाठी पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रीया राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षाकडून करण्यात येत आहे.

पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमासाठी संस्थांना शिखर परिषदांची मान्यता, संचालनालयाची मान्यता, त्यानुसार संबंधित विद्यापीठांकडून संलग्नीकरण प्रदान केल्याची माहिती अद्ययावत करुन ती पडताळणी करण्याबाबत प्रवेश नियामक प्रधिकरणाने संदर्भाधीन पत्रान्वये कळलि आहे. त्यानुसार या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त असलेल्या सर्व व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या पदव्युत्तर पदवी संस्थांनी दिनांक २९.०६.२०१९ रोजी, सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत माहिती भरावी. त्याकरीता प्रवेश नियामक प्राधिकरणाने http://technical.mahacet.org/ ही ऑनलाईन प्रणाली उपलब्ध करुन दिलेली आहे सुलभ संदर्भासाठी या कार्यालयास ई-मेलव्दारे प्राप्त झालेल्या संचालनालयाच्या पत्राची व प्राधिकरणाच्या सविस्तर सूचनांची प्रत सोबत जोडली आहे. **ऑनलाईन भरलेल्या माहितीचा प्रिंट व संस्था /अभ्यासक्रम मान्यतेच्या पत्रासह (अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद व इतर शिखर परिषद,तंत्र शिक्षण संचालनालय,संबधीत विद्यापीठ संलग्नता इत्यादि ) आपल्या संस्थेच्या दूतास खाली दिलेल्या वेळापत्रकानुसार उपस्थित राहण्याबाबत सूचित करावे. या बाबत कोणतीही मुदतवाढ दिलि जाणार नाही यांची सर्व पदवी संस्थांनी नोंद घ्यावी**

| अ.क्र. | जिल्हा | दिनांक |
|---|---|---|
| १ | **पुणे विभागातील सर्व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम संस्था (एमबीए / एमसीए /एम. ई. / एम.टेक. /एम. आर्च इत्यादी)** | ०२.०७.२०१९ |

आपल्या संस्थेने भरलेल्या माहितीच्या आधारे केंद्रीभूत प्रवेश देण्यात येणार असल्याने व सदरची माहिती प्रवेशासंबंधी असल्याने, माहितीची संवेदनशीलता व कालमर्यादा लक्षात घेवून ती विहीत कालत्त्वधीत व अचूक असावी याबाबत दक्षता घेण्यात यावी. संस्थेने चुकीची माहिती भरल्यास व त्यानुसार प्रवेश प्रक्रियेमध्ये अडचणी उद्भवल्यास, त्यास संबंधित संस्था सर्वस्वी जबाबदार राहील याची नोंद घ्यावी.

सोबत : वरीलप्रमाणे.

प्र.सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.

प्रत : १. मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई-१ यांना माहितीसाठी सविनय सादर.
२. या कार्यालयातील प्रोग्रामर यांना या कार्यालयाच्या सकेतस्थळावर प्रदर्शित करण्यासाठी.